Amit R. Bijwe
Mob.: 9422917360
FISH O FISH
AQUARIUM
Up to 20% Discount
Dog Food Accessories
Birds Cages
• Pedigree • Royal Canin • NGD • Whiskas • SmartHeart • Me-O
•Fishes •Fancy Imported Tank •Aquarium Accessories
Ganesh colony, Shilangan Road, (Ravi Nagar Road) Amt. ☎ : 2562939

पुरोगामी राष्ट्रीय विचाराचे दैनिक
# हिंदुस्थान
७६ वर्ष
स्नेह, विश्वास आणि परंपरेचे
www.dainikhindusthan.com
marathevinod62@gmail.com
epaper.dainikhindusthan.com

DAIKIN AIRCONDITIONER
एकमेव होलसेल डिस्ट्रिब्युटर
मॉडर्न इलेक्ट्रॉनिक मॉल
0% INTEREST FINANCE
RUKHMINI NAGAR, AMRAVATI
86000 500 15

■ वर्ष ७६ वे/अंक २३२ वा ■ ■ अमरावती, शुक्रवार दिनांक १० एप्रिल २०२६ ■ ■ संस्थापक : कै. श्री. बाळकृष्ण विष्णू मराठे ■ ■ भारतीय सौर २० चैत्र १९४८ ■ ■ पृष्ठे १६ ₹ ४.०० ■

किलो प्रमाणे मिळेल
ग्रिन नेट चे होलसेल विक्रेता
९९९ च्या खरेदरवर आकर्षक उपहार मोफत
सागर प्लास्टिक
100% होलसेल भावात
प्रो. प्रा. आकाश प्रकाशराव शिरभाते
मल्टी मॉल
चित्रा चौक, फुटाणा लाईन, अमरावती
इस से सस्ता और अच्छा कही नही
8184057777
9822032885
ग्रिन नेट चे होलसेल विक्रेता
किलो प्रमाणे मिळेल
९९९ च्या खरेदरवर आकर्षक उपहार मोफत

## आसाममध्ये इतिहासातील सर्वाधिक ८५.२१% मतदान ; पुद्दुचेरीमध्ये ९०% मतदान; केरळमध्ये ४९ वर्षात दुसऱ्यांदा विक्रमी मतदानाची नोंद

नवी दिल्ली दि. ९ : आसाम, केरळ आणि पुद्दुचेरी येथील विधानसभा निवडणुकांसाठीचे मतदान आज सायंकाळी ६ वाजता संपले. निवडणूक आयोगाच्या माहितीनुसार, सायंकाळी ५ वाजेपर्यंत आसाममध्ये ८४.४२%, केरळमध्ये ७५.०१% आणि पुद्दुचेरीमध्ये ८६.९२% मतदानाची नोंद झाली.

पुद्दुचेरीमध्ये, मन्नादिपेट येथील एका मतदान केंद्रावर काँग्रेस आणि भाजपच्या समर्थकांमध्ये संघर्ष उफाळून आला. जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांनी लाठीमार केला. पुद्दुचेरीचे मुख्यमंत्री एन. रंगसामी हे मतदान करण्यासाठी दुचाकीवरून (मोटारसायकलवरून) मतदान केंद्रावर पोहोचले.

केरळमध्ये, माजी संरक्षण मंत्री आणि काँग्रेस नेते ए.के. अँटनी यांनी तिरुवनंतपुरम येथे आपला मतदानाचा हक्क बजावला. प्रसारमाध्यमांशी बोलताना त्यांनी सांगितले, केरळमधील जनता भाजपच्या बाजूने नाही. हे राज्य गेल्या १० वर्षांपासून कुशासनाखालील सरकारच्या अधिपत्याखाली राहिले आहे; त्यामुळे, यावेळी नक्कीच सत्तापरिवर्तन होईल.

दरम्यान, आसाममध्ये मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी गुवाहाटी येथील कामाख्या मंदिरात जाऊन दर्शन घेतले. त्यानंतर दुपारच्या वेळी, आपल्या पत्नीसह त्यांनी जलुकबारी येथे मतदान केले.

आसाममध्ये, ४१ पक्षांचे ७२२ उमेदवार १२६ जागांसाठी निवडणूक लढवत आहेत. दरम्यान, केरळमध्ये २ कोटी ७१ लाख मतदार ८९० उमेदवारांमधून आपल्या नेत्यांची निवड करतील. पुदुच्चेरीमध्ये, २० पक्षांचे २९४ उमेदवार आपले नशीब आजमावत आहेत. या तिन्ही राज्यांमध्ये, १० लाखांहून अधिक मतदार पहिल्यांदाच मतदान करणार आहेत.

केरळमध्ये, ७० वर्षांत पहिल्यांदाच एखादे मुख्यमंत्री 'हॅट्रिक' साधण्याच्या उद्देशाने निवडणूक लढवत आहेत. आसाममध्ये, सलग तिसऱ्यांदा सरकार स्थापन करण्यासाठी भाजप हिमंता बिस्वा सरमा यांच्यावर विसंबून आहे. दरम्यान, पुदुच्चेरीमध्ये काँग्रेसचे माजी नेते एन. रंगासामी पाचव्यांदा सत्तेवर परतण्यासाठी प्रयत्नशील आहेत.

## बारामती पोटनिवडणुकीतून काँग्रेसची माघार



मुंबई दि. ९ : राज्याचे लक्ष लागलेल्या बारामती विधानसभा पोटनिवडणुकीतून काँग्रेसने अखेर माघार घेतली आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासमोर काँग्रेसने आकाश मोरे यांना उमेदवारी दिली होती. परंतु आज आकाश मोरे यांची उमेदवारी मागे घेण्यात आली आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी पत्रकार परिषद घेऊन बारामतीच्या पोटनिवडणुकीतून माघार घेत असल्याचं जाहीर केले. पोटनिवडणुकीतील उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा आज शेवटचा दिवस होता. त्यामुळे आज सकाळपासून राज्यात राजकीय विविध घडामोडी आणि ट्विस्ट पाहायला मिळाले.

हर्षवर्धन सपकाळ पत्रकार परिषदेत *(उर्वरित पान २ वर)*

## अशोक खरातप्रकरणात प्रतिभा चाकणकरांची चौकशी होणार

अहिल्यानगर दि. ९ : नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरातला एसआयटीने आज पुन्हा एकदा न्यायालयात हजर केले होते, यावेळी न्यायालयाने अशोक खरातला आणखी ५ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. त्यामुळे, खरातचा पोलिसांच्या तावडीतील मुक्काम आणखी वाढला आहे. खरातवर एकूण १२ गुन्हे दाखल असून एसआयटीने न्यायालयातून आज लगेचच तिसऱ्या गुन्ह्यात त्याचा ताबा घेतला. सरकारवाडा पोलिस ठाण्यात दाखल असलेला हा तिसरा गुन्हा अत्यंत गंभीर असून, एका ७ महिन्यांच्या गरोदर महिलेवर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप खरातवर आहे. प्रसूती सुरळीत व्हावी आणि मुलगाच होईल, असे *(उर्वरित पान २ वर)*

## युद्धविराम रद्द? पुन्हा होणार भीषण युद्धाला सुरुवात इराणने उचललेल्या पावलामुळे जगभरात मोठी खळबळ

तेहरान दि. ९ : इराण आणि अमेरिकेमध्ये दोन आठवड्यांसाठी युद्धविराम झाला आहे. बुधवारी याबाबत अधिकृत घोषणा करण्यात आली. इराण आणि अमेरिकेत युद्धविराम व्हावा यासाठी पाकिस्तानने पुढाकार घेतला होता. मात्र युद्धविरामाची घोषणा झाल्यानंतर दुसऱ्याच दिवशी आता मोठी बातमी समोर आली आहे. इराणकडून युद्धविरामाचं उल्लंघन केलं जाण्याची शक्यता आहे. अमेरिका आणि इराणमध्ये दोन आठवड्यांसाठी युद्धविराम झाला आहे. या काळात इस्लामाबादमध्ये दोन्ही देशांच्या प्रतिनिधींमध्ये चर्चा होणार आहे. मात्र या युद्धविरामाच्या प्रस्तावामधील एका महत्त्वाच्या अटीचं इस्रायलकडून उल्लंघन करण्यात आलं आहे. लेबनॉनवर सुद्धा हल्ले होणार नाहीत असं या प्रस्तावामध्ये म्हटलं होतं.

मात्र युद्धविरामाची घोषणा होऊन काही तास उलटत नाहीत तोच इस्रायलकडून लेबनॉनवर भीषण बॉम्ब हल्ले करण्यात आले आहेत. त्यामुळे इराण प्रचंड नाराज झाला आहे. इराणकडून आता इस्लामाबादमध्ये आपलं शिष्टमंडळ पाठवण्याचा निर्णय वापस घेतला जाण्याची शक्यता आहे. युद्धविरामावर इस्लामाबादमध्ये चर्चा होणार आहे, त्यासाठी अमेरिका आणि इराणकडून आपलं शिष्टमंडळ पाठवलं जाणार आहे. मात्र लेबनॉनवर झालेल्या हल्ल्यानंतर आता इराण यातून माघार घेण्याची शक्यता आहे. इस्लामाबादमधील इराणच्या राजदूतांनी युद्धविरामासंबंधित एक पोस्ट डिलिट केल्यानं पुन्हा एकदा युद्धाला सुरुवात होऊ शकते, असं म्हटलं जात आहे. दरम्यान लेबनॉनचा समावेश हा युद्धविरामामध्ये नव्हता असं आता अमेरिकेनं देखील म्हटलं आहे.

पाकिस्तानमधील इराणी राजदूत रजा अमीरी मोगदम यांनी गुरुवारी आपली एक पोस्ट सोशल मीडियावरून डीलीट केली आहे. या पोस्टमध्ये युद्धविरामाची घोषणा झाल्यानंतर इराणचं शिष्टमंडळ चर्चेसाठी इस्लामाबादमध्ये येणार असल्याचं *(उर्वरित पान २ वर)*

## ...तोपर्यंत आम्ही हल्ले करत राहू : नेतन्याहू



तेल अवीव दि. ९ : लेबनानमध्ये इस्रायलच्या लष्कराने केलेल्या हवाई हल्ल्यानंतर इराणने थेट शस्त्रसंधी करारातून बाहेर पडण्याची धमकी दिली. इतकंच नाही, तर होर्मुझ सामुद्रधुनी पुन्हा बंद करत अमेरिकेची कोंडी केली. त्यानंतर इस्रायलचे पंतप्रधान नेतन्याहू यांनी हिजबुल्लाहवरील हल्ले थांबवणार नाही, असा इशारा दिला आहे.

लेबनानमध्ये इस्रायलच्या लष्कराने बुधवारी (८ एप्रिल) केलेल्या हल्ल्यात तब्बल २०३ लोक मरण पावले, तर १००० पेक्षा जास्त जखमी *(पान २ वर)*

## रशियाची युरोपीयन राष्ट्रांवर मोठी कारवाई, थेट पाणबुड्या, समुद्रात मोठा खेळ, जगाची झोप उडाली

मास्को दि. ९ : अमेरिका, इस्रायल आणि इराणमध्ये भीषण युद्ध सुरू होतं. या युद्धामुळे मध्य पूर्वेत मोठा तणाव निर्माण झाला होता. अखेर ४० व्या दिवशी इराण आणि अमेरिकेकडून युद्धविरामाची घोषणा करण्यात आली आहे. या युद्धाकडे संपूर्ण जगाचं लक्ष लागलं होतं. युद्धविराम होताच संपूर्ण जगानं सुटकेचा निश्वास सोडला. याचं महत्त्वाचं कारण म्हणजे इराणने युद्धाच्या पार्श्वभूमीवर स्ट्रीट ऑफ होमूर्ज बंद केला होता. जागाला जेवढी कच्च्या तेलाची गरज आहे, त्यातील २५ टक्के तेलाची वाहतूक याच मार्गाने होते. त्यामुळे जगातील अनेक देशांवर मोठं ऊर्जा संकट निर्माण झालं होतं. इराणने तातडीने स्ट्रीट ऑफ होर्मूज सुरू करावा अशी अट युद्धविरामावेळी अमेरिकेकडून घालण्यात आली आहे आणि इराणने देखील त्याला मान्यता दिली आहे. दरम्यान संपूर्ण जगाचं लक्ष हे मध्य पूर्वेत लागलेलं असातना रशियानं मोठा खेळ केला आहे. यामुळे जगभरात खळबळ उडाली आहे.

मध्य पूर्वेत तणाव सुरू असतानाच रशियानं युरोपविरोधात मोठी कारवाई केली आहे. रशियाच्या पाणबुड्यांनी समुद्राच्या तळाशी असलेले इंटरनेट केबल्स आणि पाईपलाईन तोडण्याचा प्रयत्न केला आहे, असा आरोप ब्रिटनकडून करण्यात आला आहे. एवढंच नाही तर आपण नॉर्वेसोबत मिळून रशियाचा हा डाव उधळला असल्याचा दावाही ब्रिटनकडून करण्यात आला आहे. दरम्यान यावर रशियाकडून अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाहीये. मात्र यामुळे आता पुन्हा एकदा वातावरण तापण्याची शक्यता आहे.


दरम्यान आता ब्रिटनकडून रशियाला इशारा देखील देण्यात आला आहे. ब्रिटनच्या सुरक्षा विभागाच्या सचिवांनी रशियाला इशारा दिला आहे. आमचं तुमच्या समुद्रातील *(उर्वरित पान २ वर)*

## पॅसिफिक महासागरात मैला चक्रीवादळाचा कहर भारतालाही फटका बसणार?

नवी दिल्ली दि. ९ : जगावर मैला चक्रीवादळाचे संकट घोंघावत आहे, यामुळे अनेक देशांची चिंता वाढली आहे. पॅसिफिक महासागरात तयार झालेल्या या चक्रीवादळामुळे १९५ किलोमीटर प्रति तास वेगाने वारे वाहू लागले आहेत. हे वादळ एखाद्या देशाच्या किनाऱ्याला धडकल्यास मोठे नुकसान होऊ शकते. त्यामुळे आता या चक्रीवादळाचा भारतावर परिणाम होणार का? असा प्रश्न उपस्थित होत आहे. यावर बोलताना भारतीय हवामान विभागाने सविस्तर माहिती दिली आहे.

भारतीय हवामान विभागाने मैला चक्रीवादळाबाबत बोलताना स्पष्ट केले आहे की हे चक्रीवादळ भारतापासून खूप दूर आहे. असं असलं तरीही देशातील काही भागांमध्ये वातावरणात बदल जाणवत आहे. दक्षिण भारतात वादळी वाऱ्यांसह पाऊस आणि विजांच्या *(उर्वरित पान २ वर)*

## खरातने नातेवाईकांनाही सोडले नाही! वयाच्या २० व्या वर्षीच नात्यातील महिलेवर अत्याचार



नाशिक दि. ९ : राज्यातच नव्हे तर संपूर्ण देशात खळबळ उडवून देणारा भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणात याच्या सुरुवातीच्या काळातल्या कारनाम्याबाबतची धक्कादायक माहिती समोर आली आहे खरात याच्या काळ्या कृत्यांची साखळी दिवसेंदिवस अधिकच गडद होत चालली आहे. खरातच्या काळ्या कारनाम्याचा इतिहास हा काही आजचा नसून,तब्बल ४९ वर्षांहून अधिक जुना असल्याबाबतची माहिती आता समोर आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अशोक खरात याने वयाच्या अवघ्या २० व्या वर्षी म्हणजेच १९८० या काळात काळी कृत्य करण्यास सुरुवात केली होती. १९८० दरम्यान खरात याने त्याच्याच लांबच्या एका नातेवाईक असलेल्या महिलेला मूल होत नसल्याने भोंदूगिरीच्या जाळ्यात फसवले आणि तिचं लैंगिक शोषण केले असल्याची माहिती आहे. मात्र ही बाब उघडकीस आल्यानंतर खरात याने पोलिसी कारवाईच्या भीतीने गावातून पळ काढत तो फरार झाला होता. अशोक खरात याने गावातून पळ काढल्यानंतर तो तब्बल १५ वर्षे नेमका कुठे होता, याबाबतची माहिती मात्र पुढे आलेली नाही. या दरम्यान त्याने कोणाकडे आश्रय घेतला होता? *(उर्वरित पान २ वर)*

## अमेरिका-इराण सीजफायरनंतर पाकिस्तानची थेट 'नोबेल' शांतता पुरस्काराची मागणी

इस्लामाबाद दि. ९ : अमेरिका आणि इराणमध्ये बुधवारी झालेल्या सशर्त युद्धविरामाचे श्रेय घेण्यासाठी पाकिस्तानचा जोरदार आटापिटा सुरू आहे. आता पाकिस्तानला नोबेल शांतता पुरस्कार देण्याची मागणी केली जात आहे. ही मागणी म्हणजे अजबच विनोद आणि अत्यंत हास्यास्पद वाटते. स्थानिक माध्यमे आणि काही संघटना पाकिस्तानला नोबेल शांतता पुरस्कार देण्याची मागणी करत आहेत.

खरेतर, युद्धविरामाची घोषणा करताना अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी शहबाज शरीफ आणि मुनीर यांचा उल्लेख केला होता. पाकिस्तानातील स्थानिक माध्यमे हाचीच चर्चा करत आपला अजेंडा पुढे रेटताना दिसत आहे आणि नोबेल शांतता पुरस्काराची मागणी करत आहेत. युद्धविरामासाठी मध्यस्थी करण्यात पाकिस्तानच्या भूमिकेवर माध्यमे सातत्याने प्रकाश टाकत आहेत आणि त्याचे श्रेय स्वतःकडे घेत आहेत. यासाठी पंतप्रधान शहबाज शरीफ आणि आसिम मुनीर यांना नोबेल शांतता पुरस्कार मिळावा, अशी मागणी ते करत आहेत.

निवृत्त लेफ्टनंट कर्नल सय्यद अहमद नदीम *(उर्वरित पान २ वर)*

हर खरेदी पर उपहार पक्का*
जितनी ज्यादा खरेदी उतना ही शानदार उपहार
संपूर्ण लग्न बस्ता
आराधना
होलसेल शॉपिंग मॉल
• बनारसी शालू • डिझायनर साड्या • घाघरा ओढनी • सलवार सुट
• ड्रेस मटेरियल • रेडीमेड कोट • सुटिंग-शर्टिंग • टिनेज वेअर • किड्स वेअर
फॅशन | ज्वेलरी | चिल्ड्रेन्स वेअर | शूज व सैंडल | होम डेकोर | मैचिंग
*5000 रु से जादा की खरेदीपर
जवाहर रोड, अमरावती, ☎ 2574594
L - 2, बिझीलॅन्ड, नांदगाव पेठ, अमरावती.
ad square

### माहोल....




पाच वर्षातून एकदाच बोट दाखवायची संधी मिळते, बाकी पाच वर्ष नेतेच आपल्याला 'बोटावर' नाचवतात!

## अयोध्येत दर्शनासाठी गेलेल्या बुलढाण्यातील भाविकांच्या बसला अपघात, २ महिलांचा मृत्यू ३० जखमी



बुलढाणा दि. ९ : अयोध्येतील प्रभू रामचंद्रांच्या दर्शनासाठी गेलेल्या बुलढाणा जिल्ह्यातील खासगी बसला वाराणसी-गोरखपूर मार्गावर भीषण अपघात झाल्याची घटना घडली. जिल्ह्याच्या मोताळा तालुक्यातील धामणगाव बढे परिसरातील ४४ भाविकांना घेऊन काही दिवसांपूर्वी ही बस धार्मिक पर्यटनावर निघाली होती. अयोध्या व वाराणसी धाम व तेथून आज नेपाळकडे देवदर्शनासाठी जात असताना बोलेरो गाडीला वाचविताना या खासगी बसला वाराणसीजवळ भीषण अपघात झाला. उत्तर प्रदेशातील नादगंज जवळील नवसारा येथे रोडच्या रेलिंगला ही बस धडकल्याने हा अपघात झाल्याची माहिती मिळाली आहे.

या अपघातात जिल्ह्यातील मोताळा तालुक्यातील रोहिनखेड येथील सरस्वती *(पान २ वर)*

■ www.dainikhindusthan.com ■ फोन : २६६०४२९/२६६६४६४ ■ फॅक्स ०७२१-२६६३३६० ■ इ-मेल : dainikhindusthanpress@gmail.com ■ आर.एन.आय.क्र. ११४२०/५७ ■ पोस्टल रजि.नं. ए.एमटी./आर.एन.पी./८५/२०१८-२०२० ● अमरावती ● यवतमाळ ● अकोला ● बुलढाणा ● वाशिम